Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / SJIF Impact- 3.4 / September-2025/ Special Issue 02 Volume I (A)

37

# ग्रेट इंडिया - मेक इन इंडिया

**डॉ. संदीप जगन्नाथ वारुळे**
प्राथमिक शिक्षक,
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सायगाव

---

**प्रस्तावना**

"दुर्लभम भारते जन्म" भारत हा खूपच भव्य व दिव्य देश आहे. प्राचीन भारत हा खूपच सुजलाम व सुफलाम होता. एका कवीने तर भारताला 'सोने की चिडिया' असे म्हटले आहे. इतिहासकालीन भारत हा समृद्ध होता. भारतातून पूर्वी सोन्याचा धूर निघत होता. राम काळात व कृष्ण काळात भारत हा वैभव संपन्न होता. मागच्या काही शतकापूर्वी तर भारताची ही वैभवता पाहण्यास व तिचा अभ्यास करण्यास युवान श्वांग, फाहीयान यासारखे अभ्यासक भारतात आले व त्यांनी आपल्या प्रवास वर्णनात भारताचे भरभरून वर्णन केले आहे. पूर्वी भारताची अर्थव्यवस्था ही खूपच सक्षम होती. जगाला मार्गदर्शक होती. अशा भारताला नजर लागली, अन भारतात इंग्रजरुपी शोषक आले. सुजलाम व सुफलाम भारत हा इंग्रजांनी पूर्ण धुवून नेला. त्यामुळे भारताची ही वैभवता नष्ट झाली. इंग्रजांनी जे धोरणे आखली त्यातून भारतीय अर्थव्यवस्था ही खिळखिळी झाल्याने भारत हा विकसित स्थितीतून विकसनशील स्थितीत रुपांतरीत झाला. इंग्रजापूर्वीचा भारत हा इंग्रज आल्यानंतर खुपच क्षीण झाला. असा भारत स्वातंत्र्यानंतर पुन्हा अर्थव्यवस्थेत सक्षम करण्यासाठी भारतीय शासन कर्त्यांनी कंबर कसली व त्या दृष्टीने ' Make in India' ही संकल्पना अस्तित्वात आली. त्या भूमिकेने हा विषय महत्वाचा आहे.

**गृहीतक**

१.भारताला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी मेक इंडिया ही लाभदायक आहे.
२.भारतातील स्थानिक व्यवसाय मेक इंडियाला बळकटी आणतात.
३. मेक इंडियातून अर्थ व्यवस्था नव उत्साहित झाली.

**संशोधन पद्धती -**प्रस्तुत संशोधन विषयासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. तसेच माहिती संकलनासाठी वर्तमान पत्र व आतंरजाळाचा आधार घेतला आहे.

**विषय विवेचन -** प्रस्तुत संशोधन कार्यात पूर्वीचा भारत हा कसा महान होता व स्वातंत्र्यानंतर मेक इन इंडियातून कशी बळकटी प्राप्त होईल. याबाबत संशोधात्मक मांडणी केली आहे.

**१.वैभवशाली भारत**

**"जहा डाल डाल पर, सोने की चिडिया करती है बसेरा"** असे भारताचे वर्णन एका काव्यात केले आहे. खरोखर भारत हा खूपच संपन्न देश होता. भारतात पूर्वीच्या काळात खूपच भरभराट होती. भारत हा सर्वच क्षेत्रात पथदर्शक होता. आरोग्य, शिक्षण, उद्योग या सारख्या सर्वच क्षेत्रात भारत सक्षम होता. भारतात आरोग्य क्षेत्रात चरक नावाच्या महान अभ्यासकाने 'संहिता' लिहली. ज्यात आरोग्याबाबत खूपच मोलाची माहिती लिहली जी आरोग्य क्षेत्राला पुढील काळात लाभदायक ठरली. त्याच प्रमाणे भारतात शिक्षण देणारे खुप तपोवने होती. ज्यात ऋषी जीवनाचे व जगदीशाचे अनमोल तत्वज्ञान देत. यातच नालंदा, तक्षशीला यासारखी जग विख्यात विद्यापीठ होते. त्यामुळे अनेक परकीय विद्यार्थी भारतात शिक्षणाला येत असत.

इतकेच नव्हे तर भारत हा कृषी क्षेत्रात देखील खूपच प्रगत होता. त्यातच अन्नधान्यात स्वयंपूर्ण होता. रेशीम उद्योगात भारत हा खुपच प्रगतशील होता. भारतातील वस्तूविनिमय पद्धत ही खूपच क्रांतिकारक होती. ज्यात गावातील गरजा गावातच भागविल्या जात होत्या.

**२. इंग्रज काळात भारताची दयनीय स्थिती**

भारताची वैभवता इंग्रजांनी पूर्ण धुळीस मिळविली. इंग्रज मुळातच वैभवशाली भारताकडे व्यापाऱ्याच्या माध्यमातून आकर्षिले गेले. भारताची भव्यताने त्यांना भुरळ घातली. त्यामुळे ते इतके लोभी झाले की, त्यांना भारताचे हे वैभव लुटून न्यावे असे वाटले. त्यांनी आपल्या १५० वर्षाच्या सत्ताकाळात भारताचे सर्व वैभव लुटून नेले. शिवाय त्यांनी जाता जाता भारताचे तुकडे केले. परिणामी सशक्त भारत हा दुबळा बनला. स्वतंत्र काळानंतर भारत अति गलीतगात्र बनला. इंग्रजांनी वेगवेगळी धोरण अवलंबून भारताचे खच्चीकरण केले. त्यामुळे भारताला इंग्रजाच्या गच्छंतीनंतर पुन्हा बळकट व सक्षम करण्याचे खुप मोठे आव्हान होते. ते आव्हान पेलणास हरित क्रांती, मेक इंडिया या योजना फलदायी ठरल्या.

**३. हरित क्रांती मेक इन इंडियाचा भाग**

श्री.एम.एस स्वामीनाथन यांच्या संकल्पनेतून हरित क्रांतीचे आशादायक पाऊल भारताने टाकले. १९६६ च्या हरित क्रांतीने भारताला कृषी क्षेत्रात स्वयंपूर्ण बनविण्यास मदत केली. हरित क्रांती जणू मेक इन इंडियाचाच एक भाग होती.

**हरित क्रांतीचे वैशिष्टे**

१.उच्च उत्पादक वाणांचा वापर

©Copyright 2024 *ADRJ*. All Rights Reserved 

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / SJIF Impact- 3.4 / September-2025/ Special Issue 02 Volume I (A)

२.रासायनिक खते आणि किटकनाशकांचा वापर
३.सिंचन सुविधांचा विकास
४.नवीन तंत्रनाचा वापर

याबाबी भारताला सुजलाम सुफलाम बनविण्याच्या अनुषंगाने फारच महत्वाच्या ठरल्या

**४.मेक इन इंडिया -** भारत हा महान आहे व तो महान राहणारच. या दृष्टीकोनातून भारताला आर्थिक क्षेत्रात पुन्हा नव चैतन्य प्राप्त करून देण्याचा निर्धार करून मेक इंडिया संकल्पना मांडण्यात आली. मेक इन इंडिया संकल्पना भारताचे पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी २०१४ साली मांडली. यात भारताला जगातील औद्योगिक केंद्र बनविण्यासाठी व भारतात परकीय गुंतवणूक वाढवून भारताची उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न होते.

**फायदे**

**१.रोजगार वृद्धी -** यामुळे उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण झाले.
**२.आर्थिक वृद्धी-** देशात परकीय गुंतवणूक वाढल्यामुळे भारतात आर्थिक वृद्धी होण्यास मदत झाली.
**३.तंत्रज्ञानाचा विकास-** परकीय कंपन्यांनी भारतात आपले क्षेत्र खुले केल्यामुळे भारतात तंत्रज्ञानाचा विकास होण्यास मदत झाली.
**४.भारतीय उद्योगांना चालना -** परकीय गुंतवणूकदार भारतात गुंतवणूक करीत असल्यामुळे भारतीय उद्योगांना प्रोत्साहन मिळून चालना मिळेल.

मेक इंडिया जशी लाभदायक आहे तसेच तिचे काही तोटे देखील आहे.

**तोटे**

**१.प्रदूषण-** परकीय गुंतवणूक वाढल्यामुळे उद्योगांची वाढ होईल. त्यामुळे प्रदूषण सारख्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे.
**२.नैसर्गिक साधन सामुग्रीवर वाढता ताण-** उद्योग स्थापन करण्यासाठी जमीन,पाणी व वीज यासारख्या बाबींची उपलब्धता करून द्यावी लागते. त्यामुळे नैसर्गिक साधन संपत्तीवर पर्यायाने ताण वाढीला लागतो.
**३.स्पर्धा-** वाढत्या उद्योगामुळे स्पर्धेचे वातावरण निर्माण झाले. त्यातून कमी खर्चात जास्त उत्पादनामुळे उद्योगात स्पर्धा सुरु होते. यातून अनेक अनिष्ट परिणाम खरेदी दारांना सहन करावे लागते.

मेक इन इंडियात जे विविध कार्यक्रम सुरु झाले. त्याबाबत मांडणी पुढील प्रमाणे

**१.स्कील इंडिया** – दरवर्षी १ कोटी लोकांना प्रशिक्षित करणे.
**२.स्टार्टअप इंडिया** – अशी परिसंस्था निर्माण करणे स्टार्ट इंडियाला चालना देईल.
**३.डिजिटल इंडिया** – भारताला डिजिटल सक्षम अर्थव्यवस्थेत रुपांतरीत करणे.
**४.जन धन योजना** – ही योजना मेक इन इंडियाचाच एक भाग आहे.यातून भारताला वित्तीय सक्षम बनविण्याचा प्रयत्न आहे.
**५.स्मार्ट शहरे** – मेक इन इंडियातून भारतील शहरे स्मार्ट करण्याची योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. यामुळे शहरांचा विकास झपाट्याने होत आहे. याशिवाय भारत हा अनेक क्षेत्रात आपले वर्चस्व सिद्ध करत आहे.

**निष्कर्ष**

मेक इन इंडिया ही भारताला गत वैभव प्राप्त करून देण्यास नक्कीच लाभदायक ठरली आहे. यामुळे भारत हा जगातील एक नवीन अर्थसत्ता म्हणून उदयास आली आहे. पर्यायाने भारत हा जगातील एक मोठा निर्यातदार म्हणून भरारी घेत आहे. मेक इन इंडिया यातून भारत ग्रेट होण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. भारताला पुन्हा सोने की चिडियहोण्यासाठी मेक इन इंडिया हा नक्कीच लाभदायक ठरत आहे, यात शंकाच नाही. मेक इन इंडियातून भारतातील स्थानिक व्यवसाय हे पुन्हा सक्रीय होण्यास मदत झाली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतीमाल हा परदेशात जाऊन आपला दर्जा सिद्ध करत आहे. कौशल्य निर्मितीच्या अनेक संधी उपलब्ध होत आहे. अर्थातच मेक इन इंडिया ही भारतीय विकासाला खूपच आशावादी आहे.

**संदर्भ**

1. https://marathivishwakosh.org/64022, Date – 25/08/2025, Time – 9.00 pm
2.www.makeinindai.com, Date – 26/08/2025, Time – 11.00 pm
3. http://www.pmindia.gov.in, Date – 26/08/2025, Time – 2.00 pm
4. https://en.m.wikipedia.org/wiki/Make_in_India, Date – 26/08/2025, Time – 2.00 pm
5. https://youtu.be/1mZsRJ572D8?si=V0dT7GZgqYrj9Zdc